**सहसचिव यांचे कार्यालय, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर.**
**पहिला मजला, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५.**

## वाहनाचा जाहिर लिलावाबाबत नोटीस

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, सहसचिव यांचे कार्यालय, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाचे जूने बंद पडून असलेले खालीलप्रमाणे एकूण ०१ वाहन विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाच्या परिसरात ठेवण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | चेसिस नं. | RTO यांनी प्रस्तावित केलेले किमान मुल्य |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1 | MH-01 SA-500 | Honda City | MLKGD851L5N325510 | 55,000/- |

सदर वाहनाचा दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता आहे त्या स्थितीत जेथे आहे व जशी आहे तशी या तत्वावर लिलाव पध्दतीने लिलाव करण्यात येणार आहे.

सदर लिलावाच्या अटी व शर्ती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने ईच्छुक व्यक्ती किंवा संस्था यांनी सदरचे वाहन वर नमुद ठिकाणी जाऊन पाहावे व सदर लिलावामध्ये सहभाग नोंदवावा.

30/07/2024

**ठिकाण** :- छत्रपती संभाजीनगर
**दिनांक** :- ३० जुलै, २०२४

**(श्री. शं. पल्लोड)**
**सहसचिव, विधि व न्याय विभाग,**
**शाखा-छत्रपती संभाजीनगर**

## सहसचिव यांचे कार्यालय, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर.
## निर्लेखित वाहन लिलावाच्या अटी व शर्ती

१. जाहिरात प्रसिध्द झालेपासून व ई-लिलावाच्या तारखेपूर्वी लिलाव करावयाच्या वाहनाचा तपशिल महाराष्ट्र शासन यांचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सहसचिव यांचे कार्यालय, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात लिलावाच्या कार्यवाहीसाठी सहसचिव, विधि व न्याय विभाग, शाखा-छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम असेल. सदर लिलावासाठी वाहने यांची जेथे आहे तेथे व जसे आहे तसे त्याच परिस्थितीत विकण्यात येईल. तसेच बोलीधारकांनी वाहन पाहूनच लिलावात बोली बोलावी. त्यानंतर कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

३. लिलावात भाग घेण्यासाठी ना-परतावा असलेली ई-निविदा फीस रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर या नावाने डी.डी. स्वरुपात भरणे बंधनकारक राहील.

४. लिलावात बोली बोलण्यापुर्वी रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) बयाणा रक्कम जमा करावी लागेल. त्याशिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. लिलावाची जास्तीत जास्त बोली स्वीकारण्यात येईल. सर्वाधिक बोली बोलणा-या धारकास यशस्वी बोलीच्या २५% रक्कम किंवा संपुर्ण रक्कम बोली मंजूर झाल्यावर त्वरीत भरावी लागेल. सदर रक्कम न भरल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व आपली बोली रद्द करण्यात येईल. ई-लिलावाच्या ठिकाणी सहसचिव, विधि व न्याय विभाग, शाखा-छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम राहील.

५. लिलाव कायम केल्याबद्दल बोलीधारकास कळविण्यात आलेपासून १० दिवसांचे आत त्याने उर्वरित संपुर्ण रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरित रक्कम ठरवून दिलेले १० दिवसांच्या मुदतीत न भरल्यास १३% व्याज दराने व्याज आकारण्यात येईल व ही मुदत फक्त २० दिवसांची राहील. तरीही रक्कम न भरल्यास अनामत २५% भरलेली रक्कम जप्त करण्यात येऊन विक्री रद्द करण्यात येईल.

६. बोलीदाराने संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर संबंधित वाहन १० दिवसांचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घेण्यात यावेत. तदनंतर प्रतीदिन रु.१०० प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. लिलाव केल्यापासून ३० दिवसांचे आत वाहन ताब्यात न घेतल्यास बोली/लिलाव रद्द करण्याचा अधिकार सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.

७. बोली/ लिलाव धारकाने वाहन ताब्यात घेतांना येथील इतर वाहनांचे/ इमारतीचे/ कंपाऊंड वॉलचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करणे बोली/ लिलाव धारकास बंधनकारक राहील.

८. लिलाव शुल्क व बयाणा रक्कम सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर यांचे नावे धनाकर्ष भरणे बंधनकारक राहील. त्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही. यशस्वी बोली/ लिलाव धारकाने विकत घेतलेल्या वाहनांच्या बोलीच्या संपूर्ण रकमेवर नियमानुसार G.S.T. व इतर आवश्यक त्या कराचा शासन भरणा लिलावानंतर लिलावदाराने स्वतंत्रपणे करणे बंधननकारक राहील याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील तसेच आयकर कायद्यामधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. यात कोणतीही सूट बोली/लिलाव धारकास मिळणार नाही तसेच लिलावदारास कोणत्याही प्रकारचे कर उदा. जकात कर व इतर कर याबाबत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

९. स्वत:च्या अटी टाकुन सादर केलेले लिलावपत्रक मान्य करता येणार नाही, असे केल्यास संबंधित लिलावधारकास बोली प्रक्रियेतून अपात्र ठरवण्यात येईल.

१०. लिलावाच्या वेळापत्रकात व अटी व शर्तीत बदल झाल्यास तो बदल संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. लिलावधारकाच्या निष्काळजीपणामुळे जर लिलाव प्रक्रियेत झालेला बदल जर संबंधित लिलावधारकास न कळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

११. बोलीधारकाने लिलावात बोली लावतांना वाहनाच्या ठरवून दिलेल्या किमान मुल्याच्या किंमतीच्या वर रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) च्या पटीतच बोली लावणे बंधनकारक राहील.

१२. एकदा जाहीर केलेल्या वाहनाचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे.

१३. संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांपैकी काही अथवा पुर्ण मूळ कागदपत्रांची मागणी केल्यास ते तात्काळ सादर करणे बंधनकारक राहील.

१४. कोणत्याही लिलाव/ बोली धारकाचे दर स्वीकारणे अथवा नाकारणे बाबतचे सर्व अधिकार सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेले आहेत. सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा- छत्रपती संभाजीनगर घेतलेला निर्णय अंतिम असेल.